**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्रीमती मीरा इतवारी ससाणे
७५१ भवानी पेठ, न्यू ताज बेकारीमागे, पुणे-२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
शिक्षणविभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) ,
शिक्षणविभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७५९/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०१.१०.२००९ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्रीमती मीरा इतवारी ससाणे<br>७५१ भवानी पेठ, न्यू ताज बेकारीमागे, पुणे-२<br>**जन माहिती अधिकारी तथा** उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) ,<br>शिक्षणविभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.पी.व्ही.पाटील | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.११.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.१२.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१२.१.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२३.२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>कँप एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थांच्या तीन शासनमान्य अनुदानित माध्यमिक शाळा आहेत. संस्थेचे मुख्याध्यापकपदे व उपमुख्याध्यापकपदे आहेत. संस्थेने व शिक्षणविभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमत करुन मागासवर्गीय आरक्षण पदोन्नती ५० बिंदू नामावलींचा वापर व अनुशेष असतानांही पदोन्नती देतांना मुख्याध्यापकपदी व उपमुख्याध्यापकपदी सन जून १९९३ पासून ज्यासर्व मान्यता ठरावावरील विशेष नोंदी / टिप्पणी/ शेरा जो दिलेला आहे. त्यांचा सन २००७ पर्यंतच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती मिळाव्यात व इतर अनुषंगिक मुद्द्यांबाबतची माहिती | |

## विवेचन

कॅम्प एज्युकेशन सोसायटी, पुणे व जिल्हा परिषद (माध्यमिक)शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, पुणे यांच्यात दि.१ जानेवारी १९९१ ते २० नोव्हेंबर २००६ पर्यंत मुख्याध्यापकपदे व उपमुख्याध्यापकपदे आदी संदर्भात झालेल्या पत्रव्यवहाराच्या, त्यावरील टिपणीसह छायांकित प्रती अपीलकर्त्या श्रीमती मीरा इतवारी ससाणे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षणविभाग, पुणे जिल्हा परिषद यांच्याकडे मागितल्या होत्या. जून १९९६ पासूनच्या मुख्याध्यापक पदाविषयीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिल्या. संस्थेच्या तीन शासनमान्य अनुदानित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये आहेत. त्यामध्ये तीन मुख्याध्यापकपदे व दोन उपमुख्याध्यापकपदे आहेत. संस्थेने जून १९९६ पासून दोन मुख्याध्यापकपदे भरताना मागासवर्गीय आरक्षणाप्रमाणे पदोन्नतीचा अनुशेष भरलेला नाही. उपमुख्याध्यापक पदाविषयीची टिपण्यांसह माहिती आपल्याला मिळावी असे श्रीमती ससाणे यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

श्रीमती ससाणे यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची होती. त्यातील बव्हंश माहिती देण्यात आली असून सन १९९६ पूर्वीच्या माहितीबाबत अभिलेखाचा शोध घ्यावा लागेल. त्यासाठी मुदत मिळावी अशी विनंती जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षणविभाग, पुणे जिल्हा परिषद श्री.पी.व्ही.पाटील यांनी केली.

श्रीमती ससाणे यांनी अपील अर्जात व निवेदनात केलेले भाष्य माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विचारात घेता येणार नाही. तसेच मूळ अर्जानुसार मागितलेल्या माहितीव्यतिरिक्तचा तपशील अपिलात मागता येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) अपीलकर्त्या श्रीमती मीरा इतवारी ससाणे यांच्या दि.२०.११.२००६ च्या मूळ अर्जानुसार सन १९९६ पूर्वीची व उपमुख्याध्यापक पदाच्या संदर्भातील द्यावयाच्या राहिलेल्या माहितीबाबत अभिलेखात शोध घेऊन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षणविभाग, पुणे जिल्हा परिषद यांनी दि.१५.१०.२००९ पर्यंत कार्यवाही करावी व आयोगाला अहवाल सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ५.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विजय रामचंद्र खिलारे
मु.पो. इस्लामपूर, इंदिरा कॉलनी, रस्ता क्र.दोन,
ता.वाळवा, जि. सांगली
अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, वाळवा तालुका शिक्षण संस्था,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, वसंत कॉलेज ऑफ
एज्यूकेशन, इस्लामपूर, ता.वाळवा, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७५९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.६.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. विजय रामचंद्र खिलारे<br>मु.पो. इस्लामपूर, इंदिरा कॉलनी, रस्ता क्र.दोन,<br>ता.वाळवा, जि. सांगली<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, वसंत कॉलेज ऑफ<br>एज्यूकेशन, इस्लामपूर, ता.वाळवा, जि. सांगली | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>दि. ४.१२.२००७, दि. १३.१२.२००७, दि. १७.१२.२००७ दि. २०.२.२००८ व दि. ७.३.२००८ या दिलेल्या पत्रांचा खुलासा मिळणेबाबत | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १६.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २३.६.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

आपण वाळवा शिक्षण संस्था, इस्लामपूर, ता.वाळवा, जि. सांगली यांना दिलेल्या पत्रांचा खुलासा मिळाला नाही. आजारपणाची रजा मंजूर केली नाही. पाचव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम दिली नाही. सेवापुस्तकात चुकीच्या नोंदी केल्या, कामावर हजर करुन घेतले नाही, पगारपत्रकावर बनावट सह्या घेऊन १९ महिन्यांचा पगार दिलेला नाही, अशा तक्रारी अपीलकर्ता श्री. विजय रामचंद्र खिलारे यांनी केली.

संस्थेचे वसंत कॉलेज ऑफ एज्युकेशन, इस्लामपूर हे विनाअनुदान तत्त्वावरील महाविद्यालय असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असे आमचे मत आहे. मात्र तरीही त्यांना माहिती नाकारलेली नाही. कोणत्याही अर्जात वा पत्रव्यवहारात त्यांनी माहिती मागितलेली नाही, तर तक्रारी व त्या अनुषंगाने अपेक्षित प्रशासकीय कार्यवाही असे त्यांच्या अर्जाचे स्वरुप आहे. कामावर हजर होण्याबाबत वारंवार त्यांना पाठविलेली पत्रे त्यांनी घेतलेली नाहीत. तसेच त्यांच्या नोकरीबाबतचे सर्व विषय त्यांनी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणापुढे दाखल केलेल्या अर्जानुसार प्रलंबित आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य श्री. एस.वाय. पुजारी यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे लक्षात घेता श्री. खिलारे यांची मागणी 'माहिती'ची नाही, प्रशासकीय कार्यवाहीची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत तिची दखल घेता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.सचिन दिनकर साबळे
चंद्रमणीनगर हौसिंग सोसायटी, आमराई, ता.बारामती, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
आयुक्त व प्रादेशि संचालक,
नगरपालिका प्रशासन यांचे कार्यालय, विधान भवन, पुणे १ उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याधिकारी,
बारामती नगरपरिषद, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७६३+१३०४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०१.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपआयुक्त (सामान्य प्रशासन), आयुक्त व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन यांचे कार्यालय, विधान भवन, पुणे १ प्रतिनिधी श्री.सुभाष गोसावी

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद, ता.बारामती, जि.पुणे श्री.किरणराज यादव

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०.१०.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.११.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३१.०१.२००७ |

| ७ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>आजी व माजी नगरसेवक व नगरसेवकांच्या कुटुंबियांना, तसेच तत्कालीन कार्यरत नगरपालिका कर्मचारी व कुटुंबियांना दिलेल्या बखळ जागा, व्यापारी व निवासी गाळे धारकांबाबत.<br>(माहितीचा कालावधी १ मार्च १९८५ ते १ मार्च २००६) |
|---|---|

## विवेचन

(१) दि.१ मार्च १९८५ ते दि.१ मार्च २००६ या कालावधीत नगरसेवक व त्यांचे नातेवाईक यांना लिलावाद्वारे देण्यात आलेल्या गाळ्यांचा तपशील (अपील क्रमांक / ७६३)

(२) २५ नवनिर्वाचित नगरसेवक व त्यांचे नातेवाईक यांच्याकडील सरकारी भाड्याचे येणेदेणे, ठेकेदारी बिलाची रककम, अतिक्रमण आदी (अपील क्रमांक/१३०४)

अशी माहिती अपीलकर्ता श्री.सचिन दिनकर साबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद, ता.बारामती, जि.पुणे यांच्यकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा तथा मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद, ता.बारामती, जि.पुणे यांनी दिलेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरुन त्यांनी केलेले अपील अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), आयुक्त व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन यांचे कार्यालय यांनी फेटाळले. त्याविरुध्द श्री.साबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

आपल्याला अभिलेख पाहण्यास उपलब्ध करुन देण्यात आले व आवश्यक ती माहिती विहित मुदतीत दिली आहे. ती वस्तुस्थितीप्रमाणे असून जाणुनबुजून कोणत्याही प्रकारची खोटी व दिशाभूल करणारी माहिती देण्यात आलेली नाही. दिलेली माहिती खरी व बरोबर आहे, असे अपीलकर्त्यांचे लेखी निवेदन असलेल्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी श्री.किरणराज यादव यांनी सादर केली. (अपील क्र.७६३).

अपील क्रमांक /१३०४ मध्ये मागितलेली माहिती देण्यात आली असून ती योग्य आहे. अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), आयुक्त व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन यांचे कार्यालय यांनी तशा निष्कर्षासह श्री.साबळे यांचे अपील फेटाळले आहे, असे प्रतिपादन श्री.यादव यांनी पूरक कागदपत्रांसह केले. सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता ते रास्त दिसते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१६.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री. दिलीप सखाराम माने
व्दारा माने ॲण्ड माने ॲटोमोबाईल,
एस.टी. स्टॅण्ड रोड, इस्लामपूर,
ता.वाळवा, जिल्हा सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, सांगली

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा सचिव,
श्री तुळजा भवानी शिक्षण मंडळ, इस्लामपूर,
ता.वाळवा, जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७८६ / सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७/७/२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६/८/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१/८/२००८ |
| ५ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :- जोडपत्र 'अ' सोबत जोडले आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. ७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये या अपिलाचा समावेश होता.

सदर कार्यक्रमात श्री तुळजाभवानी शिक्षण मंडळ, इस्लामपूर, ता.वाळवा, जिल्हा सांगली या संस्थेच्या सहसचिवांनी दि. ७/२/२००९ रोजी सादर केलेल्या अहवालासोबत अपीलकर्ता श्री.दिलीप सखाराम माने अपीलकर्ता यांच्या दि. ४/२/२००९ रोजीच्या पत्राची प्रत जोडली आहे. 'सर्व माहिती प्राप्त झाली आहे, सर्व तक्रारींचे निवारण झाले आहे,' असे श्री.माने यांनी या पत्रात नमूद केले आहे. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २०-११-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.नामदेव शामराव नालंदे
संपादक करा भिमा टाईम्स, व्हिल कॉलनी, बारामती, ता.बारामती, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गटविकास अधिकारी,
पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि. पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** विस्तार अधिकारी (सांख्यिकी),
पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९१/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०१.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी (उ.श्रे.),
पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि.पुणे श्री.एस.आर.हजारे

**जन माहिती अधिकारी तथा** विस्तार अधिकारी (सांख्यिकी),
पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि.पुणे श्री.विवेक इलमे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०९.०२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.०२.२००७ /१०.१२.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.३.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.०३.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br><br>इंदिरा आवास घरकुल योजनेअंतर्गत संपूर्ण नावानिशी बारामती तालुक्यातील घरकुल मंजूर लाभार्थींची यादी. प्रत्येक ग्रामपंचायतीची स्वतंत्र यादी व इतर अनुषंगिक मुद्दे | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती देण्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून टाळाटाळ केली व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही, असे अपीलकर्ता श्री.नामदेव शामराव नालंदे यांनी आयोगाकडील अपीलअर्जात नमूद केले आहे.

श्री.नालंदे यांनी बारामती तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या कक्षेतील माहिती मागितली होती. त्या त्या ग्रामपंचायतीकडून ती घ्यावी, असे जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (सांख्यिकी), पंचायत समिती, बारामती, जि.पुणे यांनी कळविले. त्याविरुध्द श्री.नालंदे यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे अपील करावयास हवे होते, त्याऐवजी त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे अपील केले. पंचायत समितीकडे एकत्रित याद्या असतात, गाववार नसतात. तथापि, माहिती संकलित करून देण्याच्या दृष्टीने श्री.नालंदे यांना शुल्क रु.२२५०/- भरण्यासाठी कळविण्यात आले, ते त्यांनी भरले नाही. सुमारे ३००० पानांच्या याद्या व अन्य कागदपत्रे, एवढी विस्तृत माहिती शुल्क भरल्याशिवाय देणे शक्य नव्हते. त्यामुळे काही माहिती स्वतंत्र टपालाने व काही माहिती सीडीच्या स्वरूपात ती माहिती एकत्रित करून नि:शुल्क दिली. या विषयासंदर्भातील सर्व माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (सांख्यिकी), पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि.पुणे श्री.विवेक इलमे व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बारामती, जि.पुणे श्री.एस.आर.हजारे यांनी लेखी व तोंडी केले. तशी

अपीलकर्त्याची पोच त्यांनी सादर केली. जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविलेले शुल्क न भरता व आयोगाकडे अपील करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. सीडीच्या स्वरूपात, कम खर्चात माहिती पुरविण्याची जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (सांख्यिकी), पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि.पुणे यांची कृती प्रशंसनीय आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.अरुण दिनकर वडघुले
मु.पो.टाकळी, भिमा, ता.शिरुर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज जवळ, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज जवळ, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९५/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०१.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज जवळ, पुणे-१ श्री.चंद्रकांत खरटमल

**जन माहिती अधिकारी** तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज जवळ, पुणे-१ श्री.प्रदिप शिंदे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०१.१२.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.१२.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.११.०१.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.०५.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>दि.२८.०८.२००५ ते ११.११.२००६ या कालावधीत केलेल्या १ ते १० या अर्जावर कोणती कार्यवाही केली? केलेल्या कार्यवाहीचा तपशील लिखित किंवा झेरॉक्स मिळाव्यात. यातील काही अर्ज प्रलंबित असेलेची कारणे मिळावीत, आपल्या कार्यालयात दाखल तक्रार / अर्जावर अर्जदारास किती दिवसात लेखी कळविले जाते. तसेच कच्चे व पक्के लायसन्स किती दिवसात दिले जाते. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.अरुण दिनकर वडघुले यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्याकडे विविध तक्रारी व सूचना करणारे अर्ज पाठविले होते. त्याबाबतची माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्याकडे मागितली आहे. त्यांच्या पत्रांना वेळोवेळी उत्तरे देण्यात आली असून, त्यांची मागणी मुख्यतः माहितीची नसून तक्रारी व सूचनावजा आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.प्रदिप शिंदे व अपिलीय प्राधिकारी श्री.चंद्रकांत खरटमल यांनी केले. प्रादेशिक परिवहन खात्यातील अधिकाऱ्यांबद्दलच्या तक्रारी दूर करण्याचे आदेश द्यावेत. ग्राहकांना हेलपाटे मारायला लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशा स्वरुपाच्या त्यांच्या मागण्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्यांचा विचार करता येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ५.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.शेखर दत्तात्रय साळी
वृंदावन हौसिंग कॉम्पलेक्स,
सेक्टर "डी" फ्लॅट बी-१३, पौड रोड, कोथरुड, पुणे -३८ **अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** शासकीय माहिती अधिकारी,
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पुणे -३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८११ ६७०, ७०४, /पुणे/२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.११.२००८(अ.क्र.६७० व ७०४)<br>दि.३०.०९.२००९(अ.क्र.८११) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शेखर दत्तात्रय साळी
वृंदावन हौसिंग कॉम्पलेक्स, सेक्टर 'डी' फ्लॅट बी-१३, पौड रोड, कोथरुड, पुणे -३८

**जन माहिती अधिकारी तथा** शासकीय माहिती अधिकारी,
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पुणे -३७ श्री.सुनिल देशमुख (दि.२६.११.२००८)

**जन माहिती अधिकारी तथा** शासकीय माहिती अधिकारी,
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पुणे -३७ श्री.विनायक कोकरे (दि.२६.११.२००८)

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ८११ | दि.०७.०६.२००६ | दि.१३.०९.२००६ | दि.१७.०२.२००७ | दि.०४.०४.२००७ |
| ६७० | दि.१२.२.२००६ | दि.९.१०.२००६ | दि.२७.१२.२००६ | दि. २८.३.२००७ |
| ७०४ | दि.१९.१०.२००६ | दि.३०.१२.२००६ | दि.२०.२.२००७ | दि.१८.१२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** <br> माझे पत्र दि.०७.०६.२००६ वर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था व अतिरिक्त उपनिबंधक सहकारी संस्था यांनी केलेल्या कारवाईची माहिती | | | |

## विवेचन

वृंदावन हौसिंग कॉम्प्लेक्स, सेक्टर डी, विंग ए ते डी सहकारी संस्था, पौड रोड, कोथरुड, पुणे-३८ या संस्थेचा लेखापरीक्षण अहवाल लेखापरीक्षकांनी चुकीचा दिला. त्याच्या पुर्ननिरीक्षण अहवालातही त्रुटी आहेत. त्याबाबत वारंवार तक्रारी करुनही कोणतीही कारवाई जन माहिती अधिकारी तथा शासकीय माहिती अधिकारी, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे करीत नाहीत, अशी अपीलकर्ता श्री.शेखर दत्तात्रय साळी यांची तक्रार आहे. त्यासाठी विविध पातळ्यांवर पत्रव्यवहार, अर्ज व अपिले ते करीत आले आहेत. आपल्या मागणीनुसार चौकशी केली जात नाही, माहिती दिली जात नाही, तक्रार करुन ३२० दिवस झाले तरी चौकशी पूर्ण झालेली नाही, म्हणून जन माहिती अधिकारी तथा शासकीय माहिती अधिकारी, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे

यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी श्री.साळी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जांमध्ये व निवेदनांमध्ये केली आहे.

श्री.साळी यांची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. त्या संदर्भात त्यांना मागितलेली माहिती वेळोवेळी देण्यात आलेली आहे. संस्थेच्या मूळ लेखा परीक्षकांवर कारवाई करण्याबाबत त्यांनी दि.१६.१.२००८, दि.२८.१.२००८, दि.२६.२.२००८ रोजी अर्ज दिले होते. या अर्जांबाबत जिल्हा विशेष लेखा परीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, पुणे यांच्याशी दि.८.५.२००८ रोजी चर्चा झाली. या चर्चेत आपल्या सर्व शंकांचे निरसन झालेले आहे, त्यामुळे वरील अर्जांबाबत कोणतीही तक्रार नाही. तसेच फेरलेखापरीक्षण अहवालाची प्रत मिळाली, असे श्री.साळी यांनी लेखी दिल्याचे त्यांच्या पत्राच्या छायांकित प्रतीसह जन माहिती अधिकारी यांनी सादर केले.

आपण केलेल्या अर्जानुसार चौकशी व्हावी, यासाठी आपण अपील केलेले नाही, असे श्री.साळी यांनी दि.१.१०.२००९ च्या पत्रान्वये(प्राप्त दि.५.१०.२००९) आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. मात्र उपनिबंधक, पुणे शहर-१ यांनी अपिलाच्या तारखेपर्यंत-२१० दिवसांत, तसेच आजपर्यंत-३२० दिवसांत कारवाई केलेली नाही. सहकार आयुक्त यांच्याकडे सहा महिन्यात दहा अर्ज केले. त्यांनी प्रत्येक अर्जाची दखल न घेता दहा अर्जांनंतर सर्व अर्ज उपनिबंधकांबद्दल तक्रार असताना, उपनिबंधकांना पत्र न पाठविता इतर कार्यालयांना पत्र पाठवून आठ दिवसात चौकशी करण्यास सांगितली. सहकार आयुक्त व अप्पर निबंधक यांना समक्ष भेटून तक्रार अर्ज दिले, परंतु काहीही कारवाई झाली नाही, असे श्री.साळी यांनी लेखी निवेदनामध्ये म्हटले आहे. ते लक्षात घेता श्री.साळी यांची मुख्य मागणी तक्रार अर्जावरील चौकशीची व संबंधितांवरील कारवाईची आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विचारात घेता येणार नाही. याच मागणीसाठी ते आयोगाकडे वारंवार अपिले व पत्रव्यवहार करीत आहेत, हे योग्य नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिलें अमान्य करण्यात येत आहेत.

(२) अपीलकर्ता श्री.शेखर दत्तात्रय साळी यांच्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी दि.१०.११.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २६ .१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. सय्यद उस्मान सय्यद अब्दुल्ला
८७१, शुक्रवार पेठ, सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाययक धर्मादाय आयुक्त,
सोलापूर, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
मोमीन जमात ट्रस्ट, शुक्रवार पेठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सय्यद उस्मान सय्यद अब्दुल्ला
८७१, शुक्रवार पेठ, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
मोमीन जमात ट्रस्ट, शुक्रवार पेठ, सोलापूर श्री. अमीर अहमद इस्माईल खान

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.११.२००७ |

८ **माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे.**

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने त्याच दिवशी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागितलेली कोणतीही माहिती देऊ नये, असा ठराव मोमीन जमात ट्रस्टने केला व आपल्याला माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. सय्यद उस्मान सय्यद अब्दुल्ला यांनी केली.

अपीलकर्ता श्री. सय्यद उस्मान सय्यद अब्दुल्ला हे स्वतः ट्रस्टचे सदस्य होते. चार वर्षे ट्रस्टी असताना त्यांनी उपस्थित न केलेले प्रश्न ते दबाव तंत्रांचा भाग म्हणून व त्रास देण्यासाठी आता वेगवेगळ्या मार्गाने मांडत आहेत. ट्रस्टची इमारत आमदार निधीतून बांधलेली नाही किंवा शासकीय मदतही ट्रस्टला मिळत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ संस्थेला लागू होत नाही. तथापि अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेल्या निर्णयानुसार श्री. सय्यद उस्मान सय्यद अब्दुल्ला यांना माहिती दिली. ज्या बैठकीची माहिती त्यांनी मागितली आहे, ती संस्थेने बोलाविलेली नव्हती. त्यामुळे अन्य संस्थेच्या बैठकीतील ठराव आदी माहिती आमच्याकडे नाही, म्हणून ती देता आलेली नाही, असे प्रतिपादन ट्रस्टचे सचिव श्री. अमीर अहमद इस्माईल खान यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता ट्रस्टचे सचिव श्री. अमीर अहमद इस्माईल खान यांचे माहिती देण्याबाबतचे प्रतिपादन मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९.१०.२००९**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिल देवीदास झाड
१२७, रविवार पेठ, पुणे -२ अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता, पाणीपुरवठा,
पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता, पाणीपुरवठा,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२७+५६४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.८.२००८(अ.क्र.८२७), दि.१७.२.२००९ (अ.क्र.५६४) |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.सुनिल देवीदास झाड
१२७, रविवार पेठ, पुणे -२

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता, पाणीपुरवठा,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.पी.एस.निरभवणे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता, पाणीपुरवठा,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.स.ल.घुमे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.५.३००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.५.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>स्नॅक सेंटरला नळ जोड व आरोग्य परवाना मिळणे संदर्भात महानगरपालिकेकडे केलेल्या अर्जाबाबतची माहिती | |

## विवेचन

आपल्या स्नॅक सेंटरला नळजोड मिळावी व आरोग्य परवाना मिळावा या संदर्भात पुणे महानगरपालिकेकडे अर्ज केले होते. त्याबाबतची माहिती आपल्याला मिळाली नाही. हा आपल्या जीवनमरणाचा प्रश्न असल्यामुळे ४८ तासात माहिती द्यावी, अशी मागणी आपण केली होती. त्यानुसार माहिती दिली गेली नाही. आरोग्य परवान्यासाठी आपल्याला गेली दिड वर्षे त्रास दिला जात आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सुनिल देवीदास झाड यांनी केली.

श्री.झाड यांनी त्यांच्या स्नॅक सेंटर व्यवसायासाठी आरोग्य परवाना व नळजोड यांची मागणी केली होती, परंतु आवश्यक कागदपत्रांची पूर्तता त्यांनी केलेली नसल्यामुळे त्याबाबत कार्यवाही केली गेली नाही. संबंधित माहितीबाबत शुल्क भरण्याविषयी विहित मुदतीत त्यांना कळविले होते, परंतु त्यांनी शुल्क भरले नाही. मात्र हा त्यांच्या व्यवसायाविषयीचा प्रश्न असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ७ (२)(७(१) अन्वये ४८ तासात माहिती देण्याच्या तातडीचा जिवित व स्वातंत्र्याशी संबंधित असा विषय नाही, असे लेखी व तोंडी निवेदन जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, पाणीपुरवठा, पुणे महानगरपालिका श्री.स.ल.घुमे व अपिलीय प्राधिकारी तथा अभियंता, पाणीपुरवठा, पुणे महानगरपालिका श्री.पी.एस.निरभवणे यांनी केले.

दरम्यानच्या काळात योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर दि.२८.८.२००६ रोजी त्यांना नळजोड मंजूर करुन देण्यात आला आहे. आरोग्य परवान्याविषयीची माहिती तयार असूनही सहा महिन्यांहून अधिक कालावधी उलटल्यानंतरही त्यांनी ती स्वीकारलेली नाही, असेही त्यांनी नमूद केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ७(१) नुसार जिवित व स्वातंत्र्याशी निगडीत व तातडीचा असा हा विषय नाही. तसेच शुल्क भरुन माहिती न घेण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. आरोग्य परवाना मिळत नसल्याबाबतची तक्रार हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय आहे. तथापि अपीलकर्त्यास माहिती नि:शुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.झाड यांना १२९ पृष्ठांच्या साक्षांकित प्रती नि:शुल्क देण्यात आल्या असून त्यांची पोच असल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी श्री.स.ल.घुमे यांनी आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१.१०.२००९**